महाराष्ट्र शासन
उपसंचालक आरोग्य सेवा,
नाशिक मंडळ,नाशिक.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय आवार, शालिमार, नाशिक ४२२००१

कार्यालय : ०२५३ – २५९२२७१ व्यक्तिगत : ०२५३ – २५९२२७२ ई-मेल आयडी : ddhsnsk@rediffmail.com

जा. क्र.उपसंआसे/ /२५ दिनांक :

# दरपत्रक सुचना

प्रति,

..................................

..................................

..................................

विषय:- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत
विभागीय स्तरावरील अधिकारी यांचेसाठी फिरतीकरीता वाहनाच्या उपलब्धतेबाबत...

संदर्भ:- १) या कार्यालयाची मंजुर टिप्पणी दि.३०/०१/२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये उपसंचालक कार्यालय, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांचे मार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विभागीय स्तरावरील अधिकारी यांचेसाठी कार्यक्षेत्रातील जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र यांच्या पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्यासाठी फिरतीकरीता या (१) **Innova Crysta/Xylo/Scorpio,** (२) **Ertiga/ Maruti XL6/ Kia Carens** आणि (३) **Etios/Swift Dzire/ Xcent** एकुण ०३ वाहन प्रकारांतील वाहनासांठी ज्यांचे बनावटीचे वर्ष २०२० किंवा त्यानंतरचे आहे असे वाहन ऑन कॉल बेसिस (आवश्यकतेनुसार) तत्वावर कंत्राटी पध्दतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ चा कृती आराखडा प्राप्त होईपावेतो रु.१० लाखाच्या आर्थिक मर्यादेत (रु.१०,००,०००/-) (सुट्टीचे दिवस धरुन) पुरविण्यासाठी वाहन मालक / नोंदणीकृत वाहन पुरवठादार संस्था यांचेकडुन वाहनाचे देखभाल, तेल वंगण, वाहन चालकाचे वेतन, जिएसटी, टोल फि व इतर सर्व कर अंतर्भुत करुन विहित नमुन्यात दरपत्रक निमंत्रीत करण्यात येत आहेत.

(निविदाधारकाने उपरोक्त ०३ ही वाहन प्रकारातील वाहनांची दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे)

त्याअनुषंगाने इच्छुक पुरवठादार यांनी या सुचनेनुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात दरपत्रक दिनांक.११/०३/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजे पासुन ते दिनांक.२०/०३/२०२५ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत या कार्यालयास आपल्या सही शिक्क्यानिशी करावे.

परिशिष्ट "अ" प्रमाणे विहीत नमुन्यात दरपत्रक आणि परिशिष्ट "ब" नुसार वाहनाची आवश्यक दस्ताऐवज एकाच लिफाफ्यात सादर करावेत.

## परिशिष्ट – अ

| अ.क्र. | वाहनाची आवश्यक श्रेणी/प्रकार | वाहन संख्या | वाहनाचा प्रति कि.मी. दर |
|---|---|---|---|
| १ | **Innova Crysta/Xylo/Scorpio** (यापैकी कोणतेही एक) | १ | |
| २ | **Ertiga/ Maruti XL6/ Kia Carens** (यापैकी कोणतेही एक) | १ | |
| ३ | **Etios/Swift Dzire/ Xcent** (यापैकी कोणतेही एक) | १ | |

## परिशिष्ट – ब (दरपत्रकासोबत खालीलप्रमाणे दस्ताऐवज असणे आवश्यक आहे)

१. वाहचनाची आर सी बुकची व ट्रान्सफर प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत

२. संस्थेची नोंदणी, शॉप ॲक्ट लायसन्स, व जी.एस.टी. नंबर या कागदपत्रांची सांक्षाकित प्रत

४. विम्याचे कागदपत्राची सांक्षाकित प्रत

३. आर टी ओ यांचेकडिल वाहन फिटनेस दाखल्याची सांक्षाकित प्रत

४. अद्यावत पीयुसी प्रमाणपत्राची  सत्य प्रत

५. प्रवासी वाहतुकी साठी आर टी ओ यांनी दिलेल्या परवान्याची सत्य प्रत

६. वाहन हे संबंधित नोंदणीकृत वाहन पुरवठादार / मालक यांचे नावावर असणे आवश्यक आहे. तसेच वाहनाचे मालक वेगळे  असल्यास संबंधित वाहन मालकाचा निविदाधारक वाहन पुरवठादार संस्था/मालक यांचेशी झालेला करारनामा सादर करणे अनिवार्य आहे.

अटी व शर्तीः

ऑन कॉल बेसिस तत्वावरील वाहनाकरीता अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

१) वाहन व वाहन मालक / पुरवठादार संस्था स्थानिक असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

२) कोणतही दरपत्रक कोणतेही कारण न दाखविता नाकारण्याचा किंवा स्वीकारण्याचा अधिकार या कार्यालयाने स्वतः कडे राखून ठेवलेला आहे.

३) वाहन एका दिवसात कमीत कमी ३०० कि.मी. पेक्षा जास्त फिरल्यानंतरच अतिरिक्त कि.मी.चे भाडे प्रति किमी दरप्रमाणे आकारण्यात येईल.

४) कंत्राटी वाहन सेवा ऑन कॉल बेसिस तत्त्वावर २४ तास  दिली जाईल.

५) वाहन रात्री मुक्कमास बाहेर गावी थांबल्यास वाहनचालकाचे अतिरिक्त मानधन/भत्ता देण्याची जबाबदारी संबंधीत वाहन पुरवठा संस्थेची / मालकाची राहील

६) परिशिष्ट "अ" नुसार दरपत्रक आणि परिशिष्ट "ब" सादर करतांना एकाच बंद लिफाफ्यात सादर करावे लिफाफयावर वाहन पुरवठा दरपत्रक असे स्पष्ट नमुद करुन, वाहन पुरवठादार/संस्था यांचे नाव नमुद करावे.

५) नाशिक परिमंडळातील नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व अहिल्यानगर या जिल्हयांमधील आरोग्य संस्थाच्या पर्यवेक्षण व सनियंत्रण करणे हेतुने व आवश्यकतेनुसार राज्यस्तरीय बैठका फिरती कार्यक्रमाकरीता वाहन ऑन कॉल बेसिस तत्वावर चालेल.

६) आरोग्य संस्थाच्या पर्यवेक्षणाकामी व शासकीय कामकाजाकरिता कार्यालयाने मागणी केल्यानुसारच पुरवठा करावे लागेल. तसेच दरपत्रकांसोबत ज्या वाहनांचे दस्ताऐवज सादर केलेले आहे. त्यापैकीच वाहन मागणीनुसार उपलब्ध करुन देण्यात यावे.

७) वाहन सदैव सुस्थितीत असावे. तसेच वाहनाची किरकोळ अथवा मोठया स्वरुपाची दुरुस्ती करणे ही संस्थेची / मालकाची वैयक्तीक जबाबदारी राहील.

८) वाहनाचा कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास तसेच जीवीत हानी झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संस्थेची / मालकाची राहील. तसेच यासाठी उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांचेकडुन कोणत्याही प्रकारचा निधी दिला जाणार नाही.

९) वाहनाचा अपघात झाला तर पर्यायी वाहन तात्काळ पुरवण्याची संपुर्ण जबाबदारी संस्थेची / मालकाची राहील. अन्यथा आपले वाहन कोणतीही लेखी पुर्वसुचना न देता तात्काळ बंद करण्यात येईल.

१०) किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती एका दिवसात व मोठया स्वरुपाची दुरुस्ती तीन दिवसात करुन घेवुन वाहन संबंधित अधिकारी यांना पुरविण्याची संपुर्ण जबाबदारी संस्थेची / मालकाची राहील. सदरच्या कालावधीत पर्यायी वाहनाची व्यवस्था संस्थेने / मालकाने करणे बंधनकारक राहील.

११) भाडयाने दिलेले वाहन दुरुस्त न झाल्यास पर्यायी वाहन दरपत्रकातील अटि व शर्ती नुसार उपलब्ध करुन न दिल्यास या कार्यालयाकडुन दुसरे पर्यायी वाहन तात्काळ उपलब्ध करुन घेण्यात येईल. तसेच त्याचे भाडे संबंधित नादुरुस्त झालेल्या संस्थेकडुन / मालकाकडुन दंडात्मक रक्कम म्हणुन वसुल करण्यात येईल.

१२) वाहन केवळ संस्थेच्या / मालकाच्या अकार्यक्षमतेमुळे बंद राहील्यास व त्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असलेल्या संबंधित कक्षाच्या कामावर अनिष्ठ परिणाम झाल्यास निर्धारीत कंत्राट ठरल्यानंतर जे प्रतिदिवस भाडे येईल त्याप्रमाणे तेवढया दिवसाची रक्कम देयकातुन कापुन घेण्यात येईल. तसेच वाहनाची सेवा असमाधानकारक असल्यास लेखी समज देण्यात येईल व वाहनाच्या सेवेत सुधारणा न झाल्यास  वाहन पुरवठा सेवा तात्काळ रद्द करण्यात येईल.

१३) लॉगबुक स्वतः संस्थेने / मालकाने वाहन चालकांना पुरविण्यात यावे. तसेच ते वेळेवर भरुन संबंधितांच्या स्वाक्षरी घेण्यात याव्यात.

१४) अधिकारी व संस्था / मालक यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाल्यास याबाबतचा अंतिम निर्णय उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ नाशिक हे घेतील.

१५) वाहनाचा गैरवापर केल्यास संपुर्ण जबाबदारी वाहन मालक/संस्था मालकाची राहील.

१६) वाहन भाडयाने घेण्याची मुदत ही या कार्यालयाकडुन आदेश दिल्यापासुन ते आर्थिक वर्ष २०२५-२६ चा कृती आराखडा प्राप्त होईपावेतो पर्यंतच्या कालावधीसाठी असेल. तसेच या दरम्यानच्या कालावधीमध्ये आर्थिक मर्यादा रुपये.१० लाखापर्यंत (रु.१०,००,०००/-) असेल.

१७) सदरचे वाहन हे शासकीय आदेशानुसार **Innova Crysta/Xylo/Scorpio, Ertiga/ Maruti XL6/ Kia Carens** आणि **Etios/Swift Dzire/ Xcent** या वाहन प्रकारातील असले पाहीजे. वाहन सन २०२० किंवा त्यानंतरच्या बनावटीमधील (कालावधीतील) असले पाहीजे. तसेच सदर वाहनाची तपासणी सेवा अभियंता, फिरती यंत्र शाळा, नाशिक यांचेकडुन करुन घेवुन तसा दाखला सादर करण बंधनकारक राहील.

१८) भाडे तत्वावर वाहन देतांना वाहन चालकाचे वेतन व भत्ते हे संस्थेने / मालकानेच पुरवायचे आहे.

१९) वाहन दुरुस्तीसाठी होणारी धाव या कार्यालयाच्या कामकाजाच्या धावेत समाविष्ट असणार नाही.

२०) पिरीऑडिकल मेन्टेंनन्स करीता लागणारे फिल्टर्स, इंधन, वंगण व मजुरी तसेच वाहनाची देखभाल संस्था / मालक यांनीच करावयाचे आहे.

२१) फिरती दौऱ्या दरम्यान लागणारा पथकर (टोलनाका) वाहन मालकाकडे राहील.

२२) शासन आदेश /अनुदान तसेच वाहनाची सेवा इ. मुळे वाहन बंद करण्याचे अधिकार उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांनी राखुन ठेवले आहेत.

२३) दरपत्रक मंजुर झाल्यानंतर निविदाधारकास रक्कम रु.१००/- चा करारनामा करावा लागेल.

२४) वरील अटींचे व शर्तीचे पालन न केल्यास कोणत्याही प्रकारची लेखी पुर्वसुचना न देता आपली / आपल्या संस्थेची वाहन पुरवठा सेवा रद्द करण्यात येईल.

२५) उपरोक्त करारामध्ये कोणत्याही प्रकारचे प्रकरण उद्‌भवल्यास ते नाशिक जिल्हयातील न्यायालयामध्येच न्यायप्रविष्ट राहील याची नोंद घ्यावी.

२६) सदरचे वाहन हे टॅक्सी पासिंग ("T" परमिट) स्वरुपाचे असले पाहीजे, वैयक्तिक वाहन असल्यास आपले दरपत्रक अपात्र/रद्द करण्यात येईल.

२७) वाहनाचे सर्व कागदपत्र उदा. आर.सी./टी.सी.बुक, विम्याची कागदपत्रे, वाहन चालकाचा परवाना, वाहनाचा विमा नुतनीकरण व वाहनाचे विमा नुतनीकरण तारखेस वाहनाचे आर टी ओ यांचेकडुन वाहन तपासणे अहवाल (वाहन फिटणेस दाखला) अद्यावत असल्याचा पुरावा म्हणुन टॅक्स बुकाची छायांकित प्रत, वाहनाचे नोंदणीवर्ष १ जानेवारी २०२० नंतर असल्याबाबत प्रमाणपत्राची प्रत व वाहन फिटनेस दाखला, वाहन चालकाचे लायसन्स रिनीव्ह केलेल्या तारखेच्या नोंदीसह प्रत्येक पेपरवर निविदाधारकाचा शिक्का व स्वाक्षरी असणे आवश्यक आहे इत्यादी परिपुर्ण व अद्यावत असणे आवश्यक आहे.

२८) सदरची प्रक्रियेमधील वाहनांच्या संख्येत आवश्यकतेनुसार भविष्यामध्ये वाढ अथवा घट होऊ शकते याची नोंद घ्यावी.

२९) कंत्राटी वाहन सेवा पुढे चालु ठेवणे अथवा रदद करणेबाबतचे सर्व निर्णय मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांचे असतील.

३०) उपरोक्त करारामध्ये कोणत्याही प्रकारचे प्रकरण उद्‌भवल्यास ते नाशिक जिल्हयातील न्यायालयामध्येच न्यायप्रविष्ट राहील याची नोंद घ्यावी.

३१) दरपत्रक दि. २५/०३/२०२५ रोजी दुपारी ४:०० वाजता उघडण्यात येतील. काही अपरिहार्य कारणास्तव दिनांक, वेळेत व ठिकाणात बदल झाल्यास या कार्यालयाचे सुचना फलकावर सुचना लावण्यात येईल.

**/-Sd**

(डॉ.कपिल प्र. आहेर)
उपसंचालक, आरोग्य सेवा
नाशिक मंडळ, नाशिक